# ठाणे महापौर छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन

गांवकरी 14-10-2006

ठाणे/विशेष प्रतिनिधी

ठाणे महानगरपालिका आणि फोटो सर्कल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ८ व्या वार्षिक ठाणे महापौर छायाचित्र स्पर्धा आणि प्रदर्शनाचे उद्‌घाटन शिवसेना नेते खासदार मनोहर जोशी यांच्या हस्ते गडकरी रंगायतन येथे झाले. महापौर राजन विचारे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमास उपमहापौर गणेश साळवी, सुप्रसिद्ध छायाचित्रकार काकुभाई कोठारी, गोपाळ लांडगे, नरेश म्हस्के उपस्थित होते. खासदार मनोहर जोशी यांनी सर्व छायाचित्रकारांचे कौतुक करून स्पर्धेतील छायाचित्रांची मुक्त कंठाने प्रशंसा केली.

महापौर राजन विचारे यांनी फोटो सर्कल सोसायटी सातत्याने छायाचित्रांच्या दर्जात अधिकाधिक अचुकता आणत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

महानगरपालिका ज्या प्रकारे छायाचित्रकारांचे प्रदर्शन भरवून कौतुक करते ही गोष्ट सर्वच छायाचित्रकारांच्या कलेचा कदर करणारी आहे. अन्य महापालिकांनी देखील असाच दृष्टीकोन ठेवावाही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या स्पर्धेचा बक्षिस समारंभ दि. १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता गडकरी रंगायन येथे आमदार एकनाथ शिंदे यांच्या हस्ते, छायाचित्रकार जगदीश अगरवाल यांच्या उपस्थितीत होणार असून सदर छायाचित्र प्रदर्शन दि. १३ ते १५ ऑक्टोबर पर्यंत रसिकांसाठी खुले राहील असे संस्थेचे अध्यक्ष अँजेलो डिसिल्वा यांनी सांगितले.



ठाणे महापालिका आणि फोटो सर्कल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना खासदार मनोहर जोशी. सोबत महापौर राजन विचारे, प्रसिद्ध छायाचित्रकार काकूभाई कोठारी, गोपाळ लांडगे आदी.